कोर्ट विद्यमान श्री. मोहन टिकले, तहसिलदार नागपूर (ग्रामीण) यांचे महसुल न्यायालय, नागपूर

रा.मा.क्र.५५/एन.ए.ए.४८/२०१७-१८
मौजा—**वाडी**, प. ह. नं. ५,
तहसिल—नागपूर (ग्रामीण)

वाचा :—
१) अर्जदार श्री. निखील रामकृष्णाजी रागीट व इतर—१, रा. २०, शिवशक्ती नगर, अमरावती रोड, दत्तवाडी, नागपूर—४४००२३ यांचा अर्ज प्राप्त दिनांक—८.६.२०१८
२) महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अन्वये अनधिकृत बांधकामाचे (घर/भुखंड/अभिन्यास) नियमित करणेकरीता परवानगी आणि बी. आर. नं. १५/२००१ दिनांक—२७.१.२००१
३) मुख्याधिकारी, नगर परिषद वाडी यांचे परमिट क्र. **परमिट पत्र R.L/1286/P.W.D/17-18** दि.—३१.०३.२०१८
४) मंडळ अधिकारी, वाडी मंडळ यांचे मार्फत ग्राम अधिकारी, सा. क्र. ५, मौजा—वाडी यांचा अहवाल प्राप्त दिनांक—०३.१०.२०१८

## आदेश

(पारीत दिनांक—३१ डिसेंबर २०१८)

१) अर्जदार श्री. निखील **रामकृष्णाजी रागीट** व इतर—१, रा. २०, **शिवशक्ती नगर,** अमरावती रोड, दत्तवाडी, **नागपूर—४४००२३** यांनी अर्ज सादर केला की, त्यांचे नावाने असलेल्या मौजा—वाडी, प. ह. नं. ५ येथील **जुना खसरा क्र. ११८/३, ११८/४, आराजी १.९५ हे. आर. नविन १४०, आराजी १.४२ हे. आर. १४३, आराजी ०.५३ हे. आर.** मधिल भुखंड क्रमांक २, आराजी ३५५.४२५ चौ. मी. हा भुखंड आहे. उक्त भुखंड **मुख्याधिकारी, नगर परिषद वाडी यांचे परमिट पत्र क्र. R.L/1286/P.W.D/17-18** दि.—३१.०३.२०१८ अन्वये नियमित करण्यात आल्यामुळे त्यावर अकृषक कराची आकारणी करण्यात यावी. अर्जदार श्री. निखील रामकृष्णाजी रागीट व इतर—१, रा. २०, शिवशक्ती नगर, **अमरावती रोड,** दत्तवाडी, नागपूर—४४००२३ यांनी मौजा—वाडी, प. ह. नं. ५ येथील **१४०, आराजी १.४२ हे. आर. १४३, आराजी ०.५३ हे. आर.** मधिल भुखंड क्रमांक **२, आराजी ३५५.४२५ चौ. मी.** जागा निवासी प्रयोजनार्थ वापरात असल्यामुळे सदर भुखंडावर अकृषिक आकारणी नियमित करण्यास्तव अर्ज सादर केला. उक्त जमीनीवर स्मृती गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर तर्फे मानद सचिव **सत्यनारायण बालाजी रतन,** रा. नवाबपुरा, नागपूर यांनी अनधिकृत अभिन्यास टाकून सन **१९८५—१९८६**पासून त्यावर गैरकृषीक वापर सुरू असल्याचे निदर्शनास येत असल्यावरून सदर प्रकरण पंजीबद्ध करण्यात आले व मंडळ अधिकारी, वाडी मंडळ यांचा अहवाल मागविण्यात आला.

२) ग्राम अधिकारी, सा. क्र. ५, मौजा--**वाडी** यांनी मंडळ अधिकारी, **वाडी मंडळ** यांचे मार्फत सादर केलेला अहवाल व प्रकरणातील उपलब्ध दस्तऐवज यावरून मौजा—**वाडी,** प. ह. नं. ५ येथील जुना खसरा क्र. **११८/३, ११८/४, आराजी १.९५ हे. आर. नविन १४०, आराजी १.४२ हे. आर. १४३,** आराजी **०.५३ हे. आर.** मधिल भुखंड क्रमांक **२, आराजी ३५५.४२५ चौ. मी.** भोगवटदार **स्मृती** गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर तर्फे मानद सचिव **सत्यनारायण बालाजी** रतन, रा. **नवाबपुरा,** नागपूर यांनी नोंदणीकृत दस्त क्र. ५२१८(छा) दिनांक--१५ सप्टेंबर, १९८९ अन्वये **श्री. देवराव चिंधबाजी रागीट,** रा. शिवशक्ती नगर, वाडी यांना विक्री केल्याचे निदर्शनास येते. ( मौजा—वाडी, सा. क्र. १४०, भुखड क्र. २ व ३ Block B) (निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी ग्रामपंचायत वाडी यांचे मृत्युपत्रानुसार देवराव रागीट हे दिनांक—१३.२.२००६ मरण पावले असल्याचे निदर्शनास येते.) नोदंणीकृत दस्त क्र. २९८१/२०१७ दिनांक—११.४.२०१७ अन्वये श्री. रामकृष्णा देवराव रागीट, रा. ५१, शिवशक्ती नगर, अमरावती रोड, दत्तवाडी, नागपूर व इतर--७ यांनी बिनामोबदला हक्क सोडण्याचा लेख श्रीमती शांताबाई देवराव रागीट यांचे नावे करून दिल्याचे निदर्शनास येते.

श्रीमती शांताबाई देवराव रागीट यांचे नावें करून दिल्याचे निदर्शनास येते. श्रीमती शांताबाई देवराव रागीट, रा. प्लॉट नं. ०५, शिवशक्ती नगर, पो. स्टे. समोर, अमरावती रोड, दत्तवाडी, नागपूर यांनी नोंदणीकृत दस्त क्र. ३६७५/२०१७ दिनांक—११/०४/२०१७ अन्वये १) श्री. निखिल रामकृष्णा रागीट, २) श्री. रोशन दिलीप रागीट दोघेही रा. शिवशक्ती नगर, अमरावती रोड, वाडी यांना बक्षीसपत्र करून दिल्याचे निदर्शनास येते.

३) ज्याअर्थी अर्जदाराने कृषीक जमीनीचा अकृषीक उपयोग करण्यासाठी **म.ज.म.अ. १९६६** चे कलम ४४ अन्वये आवश्यक असलेली महसुल विभागाची परवानगी न घेता अकृषीक उपयोग सुरू केला. त्याअर्थी ते वरिल अधिनियमाचे कलम ४५ व त्याखाली निर्देशान्वये दंडात्मक कार्यवाहीस पात्र आहे.

४) नगर पालीका ठराव क्र. १८, दिनांक—२०.१०.२०१५ अन्वये नगर परिषद, वाडी यांनीअनधिकृत लेआऊट मंजुरीकरीता धोरणात्मक निर्णय घेतलेले आहे. सदर्हु भुखंड अनाधिकृत लेआऊटमध्ये अंतर्भुत असल्याचे सांगतात. त्यामुळे अधिनियमाचे कलम ४७अ अन्वये परावर्तीत कर आणि महा. जमीन महसुल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषीक आकारणी) नियम १९६९ चे कलम ८ अन्वये दंडाची आकारणी करण्यात आली.

५) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग शा.नि.क्र.एन.ए.ए.—४९८१/२४२५३—ब—२, दिनांक—३ जुलै, १९८१ अन्वये दिनांक—१.८.१९७९ पासून व शा.नि.क्र.एन.ए.ए.—१०८७/३५७०/प्र.क्र.—५३/ल—५, दिनांक—२७.९.२००१ मधील तरतुदीनुसार दिनांक—१.८.२००१ पासून निर्धारीत प्रमाण दराने सदर्हु भुखंडाची अकृषीक आकारणी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी मला प्रदान केलेल्या अधिकार व उपरोक्त कायदयाचे अंतर्गत मी तहसिलदार, नागपूर (ग्रामीण) खालील प्रमाणे कर आकारणी करीत आहे.

**मौजा—वाडी, प. ह. नं. ५**

| भुखंड क्र. | आराजी चौ. मी. | गै.कृ.कर रूपये | जि.प.सेस रूपये | ग्रा.पं.सेस रूपये | एकूण रूपये | आकारणीचे वर्ष | एकूण रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३५५.४२५ चौ. मी. | ३६/— | २५२/— | ३६/— | ३२४/— | १९८५—८६ ते २०१८—२०१९ | ११,०१६/— |

त्याचप्रमाणे अर्जदार यांनी बिना परवानगीने जमीनीचा निवासी प्रयोजनार्थ वापर सुरू केल्यामुळे अर्जदार यांनी सन १९८५—१९८६ ते २०१८—२०१९ पावेतो गैरकृषक कराची रक्कम रू. ११,०१६/—+ परावर्तीत कराची रक्कम रूपये १८०/— एकुण रू. ११,१९६/— त्वरीत शासन जमा करावी.

ज्याअर्थी नगर परिषद वाडी यांनी भूखंड महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ अन्वये उपरोक्त अभिन्यास/भुखंड नियमित करण्याचा निर्णय घेतलेला आहे व विकास शुल्क भरून घेतले आहे. त्याअर्थी सदर अधिनियमाचे कलम ५ नुसार सदरचा भुखंड अकृषीक उपयोगात आल्याचे मानण्यात येवून त्यास नगर परिषद वाडीचे नियमितीकरण पत्रातील अटी व शर्तीस तसेच उपरोक्त महसुल अधिनियमातील तरतुदीस अधिन राहून वरीलप्रमाणे अकृषीक आकारणी कायम करण्यात येत आहे.

(मोहन टिकले)
तहसिलदार,
नागपूर (ग्रामीण)

प्रतिलिपी :—

१) **अर्जदार श्री. निखील रामकृष्णाजी रागीट व इतर—१, रा. २०, शिवशक्ती नगर, अमरावती रोड, दत्तवाडी,नागपूर—४४००२३** यांना माहीती व उपरोक्त रक्कम त्वरीत खजिना दाखल करण्यास रवाना.

२) ग्राम अधिकारी, सा. क्र. ५, **मौजा—वाडी** यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

३) वसुल बाकी नविस, तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रामीण) यांना माहीतीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.

तहसिलदार
नागपूर (ग्रामीण)